जळगाव दि. १२ जून (प्रतिनिधी): केंद्रीय भूजल मंडळ यांच्या इंटर्नशिप कार्यक्रमांतर्गत देशाच्या विविध भागांतून आलेल्या विद्यार्थ्यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पर्यावरण व भूशास्त्र प्रशाळेला शैक्षणिक भेट देऊन भूविज्ञान क्षेत्रातील आधुनिक संशोधन सुविधा आणि उपकरणांची माहिती जाणून घेतली.

या भेटीचा उद्देश विद्यार्थ्यांना भूविज्ञान विषयातील अत्याधुनिक उपकरणे, संशोधन सुविधा आणि प्रयोगशाळांमधील कार्यपद्धतीची प्रत्यक्ष ओळख करून देणे हा होता. यावेळी प्रशाळेचे संचालक प्रा. संजय अत्तरदे, विभागप्रमुख प्रा. वि. म. रोकडे तसेच प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना विविध भूवैज्ञानिक उपकरणांची माहिती दिली. खडक, खनिजे, मृदा आणि भूजल विश्लेषणासाठी वापरल्या जाणाऱ्या आधुनिक साधनसामग्रीचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. तसेच भूजल शोध, भूवैज्ञानिक सर्वेक्षण, पर्यावरणीय अभ्यास आणि संशोधनामध्ये या उपकरणांचा कसा उपयोग होतो याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी विद्यापीठातील भूविज्ञान संग्रहालय, सुसज्ज प्रयोगशाळा, सेंटर फॉर इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड लिंकेजेस (KCIL) तसेच विविध संशोधन केंद्रांना भेट दिली. संग्रहालयात विविध प्रकारचे खडक, खनिजे, जीवाश्म आणि भूवैज्ञानिक नमुने पाहण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली. या भेटीमुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडण्याबरोबरच भूविज्ञान विषयाविषयीची उत्सुकताही वाढली.

यावेळी विद्यार्थ्यांनी प्राध्यापकांशी संवाद साधून भूविज्ञान क्षेत्रातील संशोधन, करिअरच्या संधी आणि भूजल व्यवस्थापनाचे महत्त्व याविषयी माहिती घेतली. विद्यापीठातील उपलब्ध शैक्षणिक व संशोधन सुविधांचे कौतुक करत ही भेट अत्यंत उपयुक्त आणि ज्ञानवर्धक ठरल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

विद्यार्थ्यांच्या व्यावहारिक ज्ञानवृद्धीसाठी तसेच शैक्षणिक आणि संशोधनात्मक दृष्टीकोन विकसित करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला आहे.

**बातमी क्र. २**

जळगाव दि. १२ जून (प्रतिनिधी): कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्न समाजकार्य महाविद्यालये, विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्रे प्रशाळेतील समाजकार्य विभाग तसेच विद्यापीठ संचलित आदिवासी अकादमी, नंदुरबार येथील एम.एस.डब्ल्यू. (प्रथम वर्ष) अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ ची केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया दि. ११ जूनपासून सुरू करण्यात आली आहे. प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रवेश माहिती पुस्तिका, नोंदणी अर्ज व इतर आवश्यक माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे.

प्रवेशासाठी नोंदणी शुल्क ७०० रुपये असून ते ऑनलाईन पेमेंट गेटवेद्वारे भरता येणार आहे. विद्यार्थ्यांनी प्रथम प्रवेश माहिती पुस्तिका काळजीपूर्वक वाचून User ID आणि Password तयार करून नोंदणी करावी. त्यानंतर अर्जामध्ये विषय, ABC ID, आधार क्रमांक, ई-मेल, मोबाईल क्रमांक आदी माहिती अचूक भरून आवश्यक कागदपत्रे, छायाचित्र व स्वाक्षरी स्कॅन करून अपलोड करावीत.

ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत दि. २५ जून २०२६ असून त्यानंतर नोंदणी करता येणार नाही. अर्ज भरल्यानंतर विद्यार्थ्यांनी दि. २६ ते २९ जून २०२६ या कालावधीत जवळच्या प्रवेश अर्ज स्वीकृती केंद्रावर (ARC) जाऊन अर्ज व कागदपत्रांची पडताळणी करून घ्यावी.

प्रवेश परीक्षेसाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांची CET परीक्षा दि. ४ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ ते १२ या वेळेत बहुपर्यायी प्रश्नांवर आधारित ६० गुणांची लेखी परीक्षा म्हणून घेतली जाईल. त्यानंतर दुपारी १२.३० वाजल्यापासून वैयक्तिक मुलाखत आयोजित करण्यात येणार आहे. ही परीक्षा जळगाव येथील सामाजिकशास्त्रे प्रशाळा, धुळे येथील विद्यावर्धिनी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आणि नंदुरबार येथील जी.टी.पी. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय या केंद्रांवर होईल.

केंद्रीय प्रवेश प्रक्रियेत दोन ऑनलाईन फेऱ्या (Round I व II) राबविण्यात येणार आहेत. नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सामान्य गुणवत्ता यादी प्रसिद्ध केली जाईल. आक्षेप नोंदविण्यासाठी मुदत दिल्यानंतर अंतिम गुणवत्ता यादी जाहीर करण्यात

येईल. CAP Round द्वारे ऑनलाईन प्रवेश वाटप करण्यात येणार असून विद्यार्थ्यांना पसंतीनुसार महाविद्यालयांची निवड करण्याची सुविधा उपलब्ध असेल. पहिल्या फेरीनंतर Freeze व Float हे पर्यायही विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहेत.

अर्ज पडताळणीसाठी सामाजिकशास्त्रे प्रशाळा, जळगाव; आदिवासी अकादमी, नंदुरबार; भगिनी मंडळ संचलित समाजकार्य महाविद्यालय, चोपडा; पंडित जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय, अमळनेर; डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे; तसेच महात्मा फुले एम.एस.डब्ल्यू. व मातोश्री झ.मो. तुर्खिया बी.एस.डब्ल्यू. महाविद्यालय, तळोदा अशी सहा प्रवेश अर्ज स्वीकृती केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत.

प्रवेश प्रक्रियेबाबत अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळाला भेट द्यावी. प्रवेश प्रक्रियेसंदर्भात काही अडचण आल्यास श्री. यतीन चौधरी, वरिष्ठ पूर्वलेखक यांच्याशी दूरध्वनी क्रमांक (०२५७) २२५७४५३ वर किंवा [support@nmu.ac.in](mailto:support@nmu.ac.in) या ई-मेलवर संपर्क साधावा, असे आवाहन एम.एस.डब्ल्यू. (प्रथम वर्ष) केंद्रीय प्रवेश प्रक्रिया समितीचे कार्याध्यक्ष प्रा. किशोर एफ. पवार यांनी केले आहे.

..........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ११ जून, २०२६

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता